Doc No 1

# सहाय्यक निंबधक सहकारी संस्था ता. चांदुरबाजार यांचे कार्यालय

2686
जा.क्र. सांनचा/नियमन कलम७७अ/आदेश/ /२०१६
कार्यालय :- सहाय्यक निंबधक,सहकारी संस्था
ता. चांदुरबाजार जि. अमरावती
दिनांक :14/10/2016

वाचा :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ {१-अ}

ज्याअर्थी **सेवा सहकारी संस्था मर्या. ब्राम्हणवाडा थडी** र.नं. ५८२ हया संस्थेची संचालक मंडळाची मुदत दि.२३/३/२०१६ रोजी संपलेली असुन अद्याप पर्यंत संचालक मंडळाने निवडणुक घेण्याकरीता आवश्यक व्यवस्था करण्यास कसुर केलेला आहे. याबाबत संस्थेचे सचिव यांना जिल्हा देखरेख संस्थेच्या तालुका शाखे अंतर्गत होणा-या मासीक व पासीक सभेत निवडणुक घेण्यास्तव तात्पुरती मतदार यादी व निवडणुक निधीचा भरणा करणेबाबत वेळोवेळी सुचीत करुनही अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

आणि ज्याअर्थी व्यवस्थापक समितीची मुदत संपण्यापुर्वी सहा महीने अगोदर मतदार यादी तयार करुन या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक होते. मात्र अद्याप पर्यंत व्यवस्थापक समितीने निवडणुक घेण्याबाबतच्या कार्यवाहीची दखल घेतली नाही व संस्थेला निवडणुकी संबधाने प्राधिकरणास सादर करावयाची माहीती नमुना इ २ सादर करणेबाबत सुचित करुनही कार्यवाही नाही.

आणि ज्यायअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ {१-अ} मधील तात्पुरत्या समितीने कलम ७३ पोटकलम १-अ मधील तरतुदी नुसार संस्थेची मुदत संपण्यापुर्वी समितीची रचना करणेसाठी निवडणुक घेण्याकरीता आवश्यक व्यवस्था करण्यात कसुर केला असल्यास प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्याची तरतुद आहे.

त्याअर्थी खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ {१-अ} व महाराष्ट्र शासन सरकार व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय मुंबई यांचे निर्णय क्रमांक सी.एस. एल./ १४९३/ ११६२/सी. आर. ४७/१५ सी दिनांक ७ ऑगष्ट १९९३ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारा नुसार मी के. एस. बलींगे सहाय्यक निंबधक, सहकारी संस्था चांदुरबाजार **सेवा सहकारी संस्था मर्या. ब्राम्हणवाडा थडी** र.नं. ५८२ या संस्थेवर प्राधिकृत अधिकारी अधिकारी म्हणुन श्री. एस. पी. बकाले यांची नेमणुक करीत आहे. सदर आदेश मी माझ्या सही व शिक्कानिशी आज दिनांक १४/१०/ २०१६ रोजी.पारीत करीत आहे.

{के.एस. बलींगे }
सहाय्यक निंबधक
सहकारी संस्था,चांदुरबाजार

प्रत कार्यवाहीसाठी

१} श्री. एस. पी. बकाले यांना कार्यवाही करीता रवाना त्यांनी संपुर्ण रेकार्ड व मालमत्तेचा प्रभार घेउुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा तसेच सहा महीन्याच्या आत सादर करावा. तसेच सहा महीन्याच्या आत समितीची रचना करण्यात यावी.

२} अध्यक्ष/ सचिव सेवा सहकारी संस्था मर्या. ब्राम्हणवाडा थडी र.नं. ५८२ त्यांनी संस्थेचे संपुर्ण रेकार्ड व मालमत्तेचा प्रभार प्राधिकृत अधिका-यास देउुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३} मा. जिल्हा उपनिंबधक सहकारी संस्था अमरावती यांना माहीती करीता सविनय सादर.

सहायक निंबधक
सहकारी संस्था,चांदुरबाजार